# 2021 22



पुण्यनगरी | बुधवार, २२ जून २०२२


## भारतीय संस्कृती योगसाधनेने सिद्ध : प्राचार्य साळुंखे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारतीय संस्कृती आणि लोकजीवन योगसाधना यांनी समृद्ध बनली आहे. भारतीय संस्कृतीमधील विविधतेतील अखंडता साधुसंतांची योगसाधना आणि तपश्चर्येमुळेच शक्य झाली, असे प्रतिपादन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी विवेकानंद महाविद्यालयातील एनसीसी आणि एनएसएस यांच्यातर्फे आयोजित आठव्या आंतरराष्ट्रीय योग दिन उद्घाटन समारंभप्रसंगी केले. अध्यक्षस्थानी चेअरमन प्रा. किरण पाटील होते.

यावेळी योगशिक्षिका गीता लिंग्रस, दीपा पाटील यांनी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. स्वागत लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांनी केले. आभार कॅप्टन सुनीता भोसले यांनी मानले. सूत्रसंचालन अवंतिका कुबेर यांनी केले. संयोजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, ५ महाराष्ट्र एनसीसी बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल मंजुनाथ हेगडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. प्रा. पी. आर. बागडी, प्रा. राजश्री पाटील, प्रा. वर्षा पवार, प्रा. बी. के. गावित, प्रा. सुप्रिया पाटील, एनएसएस आणि एनसीसी छात्र उपस्थित होते.

**INTERNATIONAL YOGA DAY**



पुण्य नगरी ३

दि० 13.08.2022

# एनसीसी छात्रांकडून हर घर तिरंगा अभियान

कोल्हापूर : स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवनिमित्त हर घर तिरंगा या योजनेचा आरंभ विवेकानंद महाविद्यालयातील एनसीसीच्या छात्रांकडून करण्यात आला. अभियानाची सुरुवात मशाल रॅलीद्वारे करण्यात आली.

राष्ट्रध्वज आणि त्याचा सन्मान यासाठी ही रॅली एनसीसी ग्रुप ते विवेकानंद कॉलेजपर्यंत काढण्यात आली. यासाठी लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, सीनिअर अंडर ऑफिसर विशाल माने, ओंकार दांगट, हर्षदा पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, कॅप्टन सुनीता भोसले, कर्नल मंजुनाथ हेगडे, सुभेदार मेजर हरिश्चंद्र शिंदे, प्रशांत जमनिक यांचे मार्गदर्शन लाभले.

**HAR GHAR TIRANGA**



पुण्य नगरी

मंगळवार, १० ऑगस्ट २०२१

# विवेकानंद कॉलेज एनसीसी छात्रसैनिकांकडून पूरग्रस्तांना मदत

कोल्हापूर : प्रतिनिधी

जिल्ह्याच्या बहुतांश भागातील लोकांना महापुराने स्थलांतरित व्हावे लागले. या महापुराने कोल्हापूर शहरातील सखल भागात असणाऱ्या सिद्धार्थनगरमधील लोकांचे न भरून निघणारे नुकसान झाले. सामाजिक बांधिलकी आणि कृतज्ञतेपोटी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३४ व्या स्मृतिदिनानिमित्त महाविद्यालयातील एनसीसी विभागामार्फत गहू, ज्वारी, साखर, तांदूळ, डाळी साबण इत्यादी दैनंदिन जीवनाश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, एनसीसी विभाग प्रमुख लेफ्ट. जितेंद्र भरममोंडा, कॅप्टन सुनीता भोसले, जिमखाना विभाग प्रमुख प्रा. किरण पाटील, प्रा. अशोक पाटील, डॉ. एम. एम. कारंजकर उपस्थित होते. उपक्रमासाठी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, ५ महाराष्ट्र बटालियन एनसीसी कोल्हापूरचे कमांडिंग ऑफिसर कर्नल आर. बी. होला, लेफ्ट. कर्नल किशोरकुमार मोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

.

**ASSISTANCE TO FLOOD EFFECTED PEOPLE**



पुढारी

बुधवार ,११ ऑगस्ट २०२१

## 'विवेकानंद'च्या एनसीसी छात्रसैनिकांकडून पूरग्रस्तांना मदत

कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) : स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त महाविद्यालयातील एनसीसी विभागातर्फे सिद्धार्थनगरमधील नागरिकांना जीवनाश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. जितेंद्र भरमगोंडा, सुनीता भोसले, प्रा. किरण पाटील, प्रा. अशोक पाटील डॉ. एम. एम. कारंजकर उपस्थित होते.

**ASSISTANCE TO FLOOD EFFECTED PEOPLE**

पुण्य नगरी

गुरुवार, ३० सप्टेंबर २०२१

# राष्ट्रप्रेमी परंपरा देशसेवेसाठी प्रेरणादायी

## ग्रुप कमांडर ब्रिगेडियर समीर साळुंखे : एनसीसीच्या शिबिरातील स्पर्धांचे बक्षीस वितरण



कोल्हापूर : एनसीसी शिबिराच्या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांसोबत ब्रिगेडियर समीर साळुंखे व इतर मान्यवर.


कोल्हापूर : प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमीतील पिढ्यानपिढ्या चालत आलेली राष्ट्रप्रेमी परंपरा देशसेवेकरिता नेहमी आत्मप्रेरणा देत असते, असे प्रतिपादन कोल्हापूर ग्रुप एनसीसीचे ग्रुप कमांडर ब्रिगेडियर समीर साळुंखे यांनी केले. ते एनसीसीच्या वार्षिक शिबिरामध्ये विविध स्पर्धांच्या पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी बोलत होते.

या दहा दिवसांच्या वार्षिक शिबिरामध्ये विद्यार्थ्यांच्या ड्रील, फायरिंग, गार्ड ऑफ हॉनर, बेस्ट कॅडेट आदी स्पर्धा पार पडल्या.

गेल्या दोन वर्षांपासून कोरोना महामारीच्या काळात एनसीसीचे वार्षिक प्रशिक्षण बंद होते. यंदा प्रथमच २० सप्टेंबरपासून १६ महाविद्यालयांतील एनसीसी कॅडेटसाठी या वार्षिक शिबिराचे आयोजन कोल्हापूर ग्रुप येथे पाच महाराष्ट्र बटालियन एनसीसीच्या वतीने केले होते. प्रशासन अधिकारी लेफ्टनंट कर्नल किशोरकुमार मोरे यांच्या नेतृत्वाखाली कोरोनाची खबरदारी घेऊन हे शिबिर यशस्वी केले. या शिबिरात कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजने सर्वोत्कृष्ट महाविद्यालयाचे पारितोषिक पटकाविले. वार्षिक प्रशिक्षण शिबिरासाठी लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, ले. प्रशांत पाटील, ले. स्वाती चौगुले, सुभेदार मेजर एच. डी. शिंदे, सुभेदार प्रशांत जमनिक, सुभेदार शिवानंद नागारी, सुभेदार शेटके, कार्यालयीन प्रशासकीय सेवकवर्गाने विशेष परिश्रम घेतले. एनसीसीचे माजी विद्यार्थी डॉ. रविकांत जाधव व राहुल मगदूम यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन कॅडेट अभिषेक हावळे, आदिती पवार यांनी केले.

**SHIVAJI TRAIL TEREK CAMP VISHALGAD**



सकाळ शुक्रवार, ७ मे २०२१ ३

## विवेकानंदच्या एनसीसी विद्यार्थ्यांचे यश

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयातील एनसीसी विभागातील चार छात्रांनी कोल्हापूर एनसीसी ग्रुपमार्फत दिल्या जाणाऱ्या निरनिराळ्या स्कॉलरशिपमध्ये बाजी मारली. शैक्षणिक आणि एनसीसी अशा दोन्ही पातळीवर अधिक सक्रिय असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय छात्र सेना यांच्या मार्फत वेगळ्या स्कॉलरशिप देण्यात येतात. कोल्हापूर एनसीसी ग्रुपमध्ये येणाऱ्या एकूण सहा बटालियनमधून निवडक विद्यार्थ्यांना ही स्कॉलरशिप दिली जाते. विवेकानंद महाविद्यालयातील सीनियर अंडर ऑफिसर रामचंद्र चव्हाण आणि केतकी सहस्त्रबुद्धे यांना त्यांच्या बेस्ट कॅडेट तर गायत्री तावडे आणि निकिता भोसले यांना कॅडेट वेल्फेअर सोसायटी स्कॉलरशिप प्रदान केली. या विद्यार्थ्यांना स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉक्टर आर. आर. कुंभार, एनसीसीप्रमुख ले. जितेंद्र भरमगोडा, ''कॅप्टन सुनीता भोसले, कर्नल आर. बी. होला, कर्नल तिवारी यांचे मार्गदर्शन लाभले.

S

**SCHOLORSHIP**

सकाळ

कोल्हापूर, बुधवार, ६ ऑक्टोबर २०२१

# एनसीसीतून देशसेवेचे बाळकडू

## ग्रुप कमांडर ब्रिगेडियर साळुंखे; विविध स्पर्धांचा बक्षीस समारंभ

कोल्हापूर, ता. ५ : छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमीतील पिढ्यानुपिढ्या चालत आलेली राष्ट्रप्रेमी परंपरा देश सेवेकरिता नेहमी आत्मप्रेरणा देते. राष्ट्रीय छात्रसेनेतील सहभाग देशसेवेचे बाळकडू तर देतोच, शिवाय व्यावहारिक जीवनात आवश्यक असणारी कौशल्येही आत्मसात करण्यास बळ देतो, असे प्रतिपादन कोल्हापूर ग्रुप एनसीसीचे ग्रुप कमांडर ब्रिगेडियर समीर साळुंखे यांनी केले. शिबिरात विवेकानंद कॉलेजने सर्वोत्कृष्ट पारितोषिक पटकाविले.

कोल्हापूर ग्रुप येथे आयोजित एनसीसीच्या वार्षिक शिबिरामध्ये पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. प्रशासन अधिकारी लेफ्टनंट कर्नल किशोर कुमार मोरे यांच्या नेतृत्वाखाली यशस्वी केलेल्या शिबिरासाठी लेफ्टनंट प्रशांत पाटील, लेफ्टनंट स्वाती चौगुले, सुभेदार मेजर एच. डी. शिंदे, सुभेदार प्रशांत जमनिक, सुभेदार शिवानंद नागारी, सुभेदार शेटके यांनी विशेष परिश्रम घेतले. लेफ्टनंट कर्नल किशोर कुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांनी आभार मानले. कॅडेट अभिषेक हावळे आणि आदिती पवार यांनी सूत्रसंचालन केले.



कोल्हापूर : वार्षिक शिबिरामध्ये विविध स्पर्धांच्या पारितोषिक वितरण प्रसंगी ग्रुप कमांडर समीर साळुंखे यांच्यासह सहभागी शिबिरार्थी.

**SHIVAJI TRAIL TEREK CAMP VISHALGAD**

पुण्य नगरी

▮ बुधवार, १८ ऑगस्ट २०२१

# 'विवेकानंद'च्या एनसीसी छात्रांची मशाल रॅली

कोल्हापूर : १५ ऑगस्ट २०२१ ला भारतीय स्वातंत्र्यदिनाचा अमृतमहोत्सव साजरा केला. भारतीय स्वातंत्र्य आणि त्याकरिता दिले गेलेले बलिदान हे सदैव भारतीय नागरिकांच्या मनात नंदादीपाप्रमाणे तेवत राहील. या भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाप्रसंगी निरनिराळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विवेकानंद महाविद्यालयातील ५ महाराष्ट्र बटालियन एनसीसी युनिटमार्फत 'आजादी की दौड' मशाल रॅलीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या मनावर राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती, निस्सीम त्याग, सर्वसमावेशकता या संस्काराची बीजे रुजण्याकरिता या मशाल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.



विवेकानंद महाविद्यालयाच्या वतीने काढण्यात आलेली मशाल रॅली.

रॅलीचे उद्घाटन लेफ्टनंट कर्नल किशोरकुमार मोरे यांच्या हस्ते झाले. सदर रॅली एनसीसी भवनपासून ते विवेकानंद महाविद्यालय परिसरातील स्वातंत्र्यसेनानी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या समाधीपर्यंत काढण्यात आली. मशाल रॅलीत एनसीसी विभागप्रमुख लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, एसयूओ सिद्धार्थ पाटील, जेयूओ श्रेयांश कोळेकर, प्रियंका आंची त्यांच्यासह वीस मुले व आठ मुली सहभागी झाल्या.

या कार्यक्रमास श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, कॅप्टन एस. एम. भोसले, ५ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल आर. बी. होला, प्रा. किरण पाटील, सुभेदार मेजर शिंदे, सुभेदार प्रशांत जमने, सुभेदार शेंडगे यांचे मार्गदर्शन लाभले.

**AZADI KA AMRIT MAHOTSAV**



४ पुढारी MY कोल्हापूर शनिवार, १३ ऑगस्ट २०२२

## ‘विवेकानंद’च्या एनसीसी छात्रांकडून ‘हर घर तिरंगा’ अभियानास प्रारंभ

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

विवेकानंद महाविद्यालयाच्या एनसीसी छात्रांकडून ‘हर घर तिरंगा’ अभियानाची सुरुवात करण्यात आली.

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होऊन स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला जात आहे. ‘हर घर तिरंगा’ अभियानास महाविद्यालयातील एनसीसीच्या छात्रांकडून अभियानाची सुरुवात मशाल रॅलीद्वारे झाली. राष्ट्रीय ध्वजाचे वितरण करण्यात आले. राष्ट्रध्वजाचा योग्य सन्मान व घ्यावयाची काळजी याची त्यांना माहिती देण्यात आली. रॅली यशस्वीतेसाठी लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, विशाल माने, ओंकार दांगट, हर्षदा पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, एनसीसी विभागप्रमुख लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांचे मार्गदर्शन लाभले.

**HAR GHAR TIRANGA**




८ पुढारी MY कोल्हापूर सोमवार, १५ ऑगस्ट २०२२

## विवेकानंद महाविद्यालयात स्वतंत्रता विभिषिका दिन

कोल्हापूर : भारतीय स्वतंत्रता विभिषिका स्मृतिदिनानिमित्त विवेकानंद महाविद्यालयात कार्यक्रम झाला. हौतात्म्य पत्करलेल्या सर्वसामान्य नागरिक यांनी केलेल्या त्यागाची स्मृती जागविण्यात आल्या. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. कट्टीमणी यांनी भारतीयांना अभिमान वाटेल असा स्वातंत्र्यदिन साजरा करीत असताना राष्ट्रप्रेम आणि देश भक्तीसाठी बलिदानाची स्मृती मनात तेवत राहाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमाचे आयोजन एनसीसी विभाग प्रमुख लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, कॅप्टन सुनीता भोसले यांनी केले. प्रास्ताविक कॅडेट प्रतीक चौगुले यांनी केले. कॅडेट सोनाली शेलार यांनी आभार मानले.

**HORRORS OF PARTITION**



दै० पुढारी, दि० 17. 9. 2021

**शिक्षणातून देश सेवेचे संस्कार घडावेत : गजानन हरळीकर**

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेज फक्त एक शिक्षण केंद्र नसून, व्यक्ती विकासामध्ये सर्वांगीणता आणणारा एक अखंड प्रवाह आहे. महाविद्यालयातील ज्ञानासोबत अनौपचारिकरीत्या या परिसरातून मिळणारे गुण हे जीवन सिद्धीसाठी उपयुक्त आहेत, असे मत भारतीय वायुसेनेतील अधिकारी स्क्वाड्रन लिडर गजानन हरळीकर यांनी व्यक्त केले.
विवेकानंद महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. सैन्य दलातील अधिकारी होण्याकरिता 'एसएसबी'ला सामोरे जात असताना भाषा व भाषांतर कौशल्ये कशी आवश्यक आहेत, मानसशास्त्रीय चाचण्यांना कसे सामोरे जावे याबाबत हरळीकर यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी सुजित पाटील, रोहित जाधव, अभिजित पारखे यांनी मार्गदर्शन केले. एनसीसी विभाग प्रमुख कॅप्टन सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. एच. पी. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रथमेश पाटील यांनी केले. साक्षी पाटील यांनी आभार मानले.

**HORRORS OF PARTITION**



सकाळ

रविवार,
२४ एप्रिल २०२२

# निर्धार पंचगंगा प्रदूषणमुक्तीचा!

'पुन्हा साथ देऊया, चला पंचगंगा वाचवूया' मोहिमेत शुक्रवारी विविध संस्था, संघटना सहभागी झाल्या. पंचगंगेसाठी सातत्याने स्वच्छता मोहिमेत सहभागी होतानाच कमीत कमी पाण्याचा वापर आणि प्रबोधनाबरोबरच सर्व कृती कार्यक्रमांत सहभागी होण्याची ग्वाही यानिमित्ताने त्यांनी दिली.

पंचगंगा वाचवूया मोहिमेत सहभागी झालेले विवेकानंद कॉलेजचे विद्यार्थी, विद्यार्थिनी व छात्रसैनिक.

25/4/2022

**SAVE WATER SAVE KOLHAPUR**



यांना आभार मानले.

पुण्य नगरी

मंगळवार, २२ जून २०२१

## विवेकांनद महाविद्यालय

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विवेकानंद महाविद्यालयात ७ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगा प्रशिक्षणाचे आयोजन केले होते. 'योगा फोर वेल बीईंग' मथळ्याखाली योग दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी योग शिबिराचे उद्घाटन केले. प्रमुख अतिथी मेजर गुगा मालती यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. योग साधक प्रा. डॉ. मिलिंद कारंजकर आणि योगगुरू आशा पाटील यांनी एनसीसी छात्रांना व एनएसएस स्वयंसेवकांना योगासनाचे धडे दिले. प्रास्ताविक तेजश्री सागावकर आणि आभार सिद्धार्थ पाटील यांनी मानले. कार्यक्रमाचे नियोजन कॅप्टन सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, प्रा. एच. पी. पाटील, प्रा. राजश्री पाटील, प्रा. डी. एम. पन्हाळकर आणि आर्या जोशी यांनी केले.

**INTERNATIONAL YOGA DAY**



आंतरराष्ट्रीय योगदिन उत्साहात साजरा

**INTERNATIONAL YOGA DAY**